**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः31.07.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या,**

- उद्योग जगता नं सरकारशी निकोप स्पर्धा करायला हवी पंतप्रधानांचं आवाहन
- अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पावरील विरोधकां चे आरोप खोडून काढले
- सरकारी वसतिगृहं आणि आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अनुदानात भरीव वाढ करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- राज्याचे मावळते राज्यपाल रमेश बैस यांना राजभवनात समारंभापूर्वी निरोप; आज होणार नवीन राज्यपालांचा शपथविधी
- केरळमधे वायनाड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे दरड कोसळून 110 जणांचा मृत्यू आणि
- पॅरिस ऑलिंपिकमध्ये नेम बाज मनु भाकर आणि सरबजोत सिंग यांना 10 मिश्र दुहेरीचं कास्य पदक

**मोदी सीआयआय**

देश विकसित भारताच्या दिशेनं वाटचाल करत असून त्यासाठी उद्योग जगता नं सरकारशी निकोप स्पर्धा करायला हवी, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारतीय उद्योग महासंघानं आयोजित केलेल्या परिषदेचं उद्धाटन केल्यानंतर ते बोलत होते. सरकार काल सुसंगत क्षेत्रात नव्या संधी निर्माण करत आहे. त्यामुळे उद्योगांनीही गुंतवणूक स्नेही करार करावेत, असं पंतप्रधान म्हणाले.

**निर्मला**

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेनं टाकलेलं पहिलं पाऊल आहे. या अर्थसंकल्पात प्रत्येक क्षेत्राचा विचार करून, प्रत्येक राज्यासाठी तरतूद करण्यात आली आहे, असं म्हणत विरोधकांनी केलेले सर्व आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी काल खोडून काढले. अर्थसंकल्पावरील चर्चेला त्या लोकसभेत उत्तर देत होत्या. कोविड आपत्तिनंतरही देशानं सातत्यानं विकास केला आहे. कृषि, पायाभूत सुविधा, शिक्षण अशा सर्व क्षेत्रांसाठीची तरतूद वाढविण्यात आली असून वित्तीय तूट नियंत्रणात ठेवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला आहे, असंही त्या म्हणाल्या.

**चौहान**

शेतकरी कल्याणासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असून मनरेगा सारख्या योजनांमध्ये कोणतीही अनियमित ता खपवून घेतली जाणार नाही, असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. ते काल लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

**वर्षा गायकवाड**

लोकसभेत शून्य काळात काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेत त्यांना ‘भारतरत्न’ हा सर्वोच्च नागरी सन्मान देण्याची मागणी केली.

**राज्य मंत्रिमंडळ**

राज्यातल्या विविध विभागांच्या वसतिगृहांमध्ये आणि आश्रम शाळांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दरडोई अनुदानात भरीव वाढ करण्याचा निर्णय काल राज्य मंत्रिमंडळानं घेतला. आदिम जमातीतल्या कुटुंबांसाठी घरकुल योजना राबवण्यासह आदिवासी सहकारी सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीचं कर्ज द्यायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. राज्यातल्या यंत्रमाग सहकारी संस्थांना राज्य सरकारकडून अर्थसहाय्य द्यायलाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**बैठक**

राज्याच्या उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठकही काल पार पडली. यात राज्यात 81 हजार कोटी रूपये गुंतवणुकीच्या सात प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यामुळे मराठवाडासह कोकण तसंच विदर्भात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार असून सुमारे 20 हजार जणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे.

**अन्नपूर्णा**

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला असून याअंतर्गत मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थी महिलेच्या कुटुंबाला तसंच केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या राज्यातील सुमारे 52 लाख 16 हजार लाभार्थ्यांना घरगुती वापराच्या वार्षिक 3 गॅस सिलिंडरचं पुनर्भरण मोफत करून दिलं जाणार आहे. यासंदर्भातला शासन निर्णय काल जारी करण्यात आला.

**बैस निरोप**

राज्याचे मावळते राज्यपाल रमेश बैस यांना काल मुंबईत राजभवनात समारंभपूर्वक निरोप देण्यात आला. राज्यपालांच्या कक्षात झालेल्या एका सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यपाल बैस आणि त्यांच्या पत्नी रामबाई बैस यांचा शाल तसंच भेटवस्तू देऊन सत्कार केला. आपल्या कार्यकाळात आपल्याला राज्य शासनाकडून उत्तम सहकार्य मिळाल्याबद्दल रमेश बैस यांनी सर्वांचे आभार मानले. भारतीय नौदलाच्या वतीनं राज्यपालांना मानवंदना देण्यात आली. यानंतर बैस यांनी रायपूरकडे प्रस्थान केलं.

**शपथविधी**

दरम्यान, राज्याचे नवनियुक्त राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचा शपथविधी आज संध्याकाळी राजभवनातील दरबार हॉलमध्ये होणार आहे.

**विखे पाटील पुरस्कार**

सहकार चळवळीचे जनक डॉक्टर विठ्ठल राव विखे पाटील पुरस्कारांची काल घोषणा करण्यात आली. यंदाचा विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रेमानंद गज्वी यांना देण्यात येणार आहे. इतर पुरस्कारार्थी मध्ये डॉ. समीर चव्हाण, प्रफुल्ल शिलेदार, डॉ.श्रीनिवास हेमाडे, प्राजक्त देशमुख यांचा समावेश आहे. कला गौरव पुरस्कार तमाशा कलावंत हसन शेख पाटेवाडीकर यांना जाहीर झाला आहे. येत्या नारळी पौर्णिमेला अहमदनगर इथं या पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

**उद्धव ठाकरे**

आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सर्व समाजाच्या नेत्यांना बोलावून चर्चा करावी आणि सर्वमान्य तोडगा काढावा, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. केंद्र सरकार आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासंदर्भात तोडगा काढत असेल तर आमच्या पक्षाचा पाठिंबा असेल, असंही ठाकरे यांनी सांगितलं.

**पटोले**

लोकसभा निवडणुकीत जनता काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली; राज्यातही परिवर्तन व्हावं ही जनतेची भावना आहे, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. विधानसभेच्या निवडणूकीसाठी जोमानं मेहनत करा, असं आवाहन काल मुंबईत झालेल्या अल्पसंख्याक विभागाच्या बैठकीत त्यांनी केलं.

**अण्णा भाऊ साठे**

साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा 1 ऑगस्ट हा जन्मदिन राष्ट्रवादी काँग्रेस राज्यभर साजरा करणार आहे. वाटे गाव या त्यांच्या जन्मगावी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तट करे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

**भूस्खलन**

केरळच्या वायनाड जिल्ह्यात काल झालेल्या भूस्खलनात आतापर्यंत 110 जणांचा मृत्यू झाला असून अनेक जखमींना विविध रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या दुर्घनटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला असून पंतप्रधान सहाय्यता निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपये तर जखमींच्या उपचारासाठी 50 हजार रुपये मदत जाहीर केली आहे.

**यश श्री शिंदे हत्या**

रायगड जिल्ह्यातील यशश्री शिंदे या तरुणीच्या हत्या प्रकरणी नवी मुंबई पोलिसांनी मुख्य आरोपी दाऊद शेख याला कर्नाटकातील अल्लर गावातून ताब्यात घेतलं आहे. त्यानं गुन्ह्याची कबुली दिली असल्याची माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त दीपक साकोरे यांनी काल नवी मुंबईत पत्रकारांना दिली. उरण तालुक्यात 27 जुलै रोजी या तरुणीचा मृतदेह अतिशय वाईट अवस्थेत आढळला होता.

**ऑलिंपिक**

भारतीय नेमबाज मनु भाकर आणि सरबजोत सिंग या जोडीनं पॅरिस ऑलिंपिकमध्ये 10 मीटर एअर पिस्टल प्रकारात मिश्र दुहेरी गटात कास्यपदक पटकावलं आहे. स्वातंत्र्योत्तर काळात एकाच क्रीडा प्रकारात एकाच ऑलिंपिकमधे दोन पदकं मिळवणारी मनु भाकर ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. या यशाबद्दल मनु आणि सरबजोत यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील वीस षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना भारताने सुपर ओव्हर मध्ये जिंकला. या विजयामुळे भारताने ही मालिका 3-0 अशी जिंकली. सुपर ओव्हर मध्ये श्रीलंका केवळ 2 धावा करू शकली तर सुर्यकुमार यादवने पहिल्याच चेंडूवर मारलेल्या चौकाराने भारताने सामना सहज जिंकला. तत्पूर्वी नियमित सामन्यात भारताने 137 धावा केल्या तर एकवेळ 2 बाद 110 अशी मजबूत स्थिती असलेल्या श्रीलंकेनेदेखील तेवढ्याच धावा केल्याने सामना सुपरओव्हर मध्ये खेळवला गेला. वॉशिंग्टन सुंदर , रवी बिष्णोई, रिंकू सिंग आणि

सुर्यकुमार यादवने प्रत्येकी दोन बळी घेतले. आता दोन्ही संघांमध्ये 2 ऑगस्टपासून पन्नास षटकांची मालिका खेळली जाणार आहे.

**पाऊस**

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आतापर्यंत 4 जणांचा मृत्यू झाला आहे. सततच्या पावसामुळे सुमारे पाचशे घरांची पडझड झाली आहे. सावित्री, अंबा, कुंडलिका नद्यांना पूर आल्यानं 3 हजारांहून अधिक जणांना स्थलांतरित करण्यात आलं. कोल्हापुरात पुराचं पाणी ओसरण्यास सुरुवात झाली असून जनजीवन हळूहळू पूर्ववत होत आहे. कोल्हापूर शहरासह करवीर तालुक्यातील घरांच्या पडझडीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरूवात झाली आहे. सांगली जिल्ह्यात पावसाचा जोर कमी झाला असला तरी पूरस्थिती अद्याप कायम आहे. गडचिरोली जिल्ह्यातही पावसाने विश्रांती घेतली आहे. मात्र विविध धरणांतून मोठा विसर्ग करण्यात येत असल्यानं जिल्ह्यातल्या 13 मार्गांवरील वाहतूक ठप्प आहे.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट माथ्यावर आणि विदर्भात वीजांसह आज तुरळक ठिकाणी मुसळधार वृष्टिचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मराठवाड्यात हलका ते मध्यम पाऊस पडेल.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**